21 व्या शतकातील आपल्या महाराष्ट्राचे अनेक डॉक्टर्स, इंजिनिअर्स व इतर उच्चशिक्षित तरुण-तरुणी जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करीत आहेत. अर्धा महाराष्ट्र उच्चशिक्षित असुनसुद्धा आपण आजही नको त्या जुन्या गैरसमजुतींना हवा देऊन आपल्या सुसंस्कृतीचा र्हास करीत आहोत. साहजिकच, मी काही सर्वच रुढी-परंपरांची गोष्ट नाही करत आहे, काही रुढी परंपरा ह्या आपल्या पुर्वजांची आपल्या भविष्यासाठी दिलेली मोलाची देण आहे आणि त्यामुळेच आपली खास ओळख आहे असे मीही मानतो. खाली दिलेल्या यादीतील अनेक चुकीच्या समजुती तर जणु आपल्या डोळ्यांसमोरचा रोजचाच प्रकार झालाय. म्हणुनच महाराष्ट्र सरकारने अलीकडेच काही क्रुर प्रथांवर जम बसविण्यासाठी ‘महाराष्ट्र नरबळी आणि अमानुष, अनिष्ट, अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंध’ कायदा पारीत केला.

आज आपल्या महाराष्ट्रामध्ये, जेथे साक्षरतेचा दर 82.91% (जनगणना 2011 नुसार) आहे. जेथील 45% जनता ही शहरी भागात राहते. जेथे आजही अनेक अश्या सामान्य अंधश्रद्धा/समजुती आहेत ज्यांना आपण फक्त जागरुकतेनेच पिटाळुन लाऊ शकतो.

## 1. लिंबु-मिरची:

जवळपास प्रत्येक वाहनावर, घरांच्या व दुकानांच्या दारावर तुम्हाला ही गोष्ट दिसेल. वाईट शक्तींना आपल्यापासुन दुर ठेवण्यासाठी लिंबु-मिरची/बाहुली बांधण्यात येतात. माहितीनुसार, यात 7 मिरच्या व 1 लिंबु असतो ज्याला एकाच धाग्याने लटकवेलेले असते. हे सर्वकाही ‘अलक्ष्मी’ ला दुर ठेवण्यासाठी केले जाते, अलक्ष्मी ही देवी लक्ष्मीची बहीण आहे. जी येताना आपल्यासोबत सर्व वाईट प्रवृत्ती, गरीबी आणि दुख घेऊन येते असे म्हणतात. तिला आंबट, झणझणीत आणि तिखट वस्तु फार आवडतात म्हणुनच लिंबु-मिरची दारात लावतात जेणेकरुन अलक्ष्मी दारातुनच स्वत:ला संतुष्ट करुन परतुन जावी आणि आपली समृद्धी शाबुत राहावी. समाजात असाही समज आहे की, जर रस्त्यावर पडलेल्या लिंबु-मिरचीवर/काळ्याबाहुलीवर जर का तुमचा पाय पडला तर त्या लिंबु-मिरची/बाहुलीने शोषलेल्या सर्व वाईट शक्तींचा प्रभाव तुमच्या डोक्यावर बसतो (तेव्हा सांभाळुन.... J).

## 2. नजर लागणे:

वाईट नजरेपासुन सुरक्षेकरीता लहान मुलांना काजळाचा टिपका लावणे, लॉकेटस घालणे, अमक्या तमक्या बाबाचा दोरा बांधणे, जळते नारळ, नजर उतरवणे ई. गोष्टी आपण सर्वच करतो (मीही सुटलो नाहीये J). मला आठवते की, लहानपणी एकदा गावी गेलो असताना मला एक अनोळखी वयस्क आजी मला सारखी पाहात उभी होती. त्याचा दुसर्या दिवशीच मला भयंकर ताप सुटला होता. माझ्या आजीने लगेच त्या बाईची नजर लागली सांगुन माझी नजर उतरवली होती आणि अहम आश्चर्य म्हणजे मी लगेच बराही झालो होतो (खरे म्हणजे ती गावातल्या डॉक्टरच्या इंजेक्शनचा कमाल होती). नजर उतरविताना मीठ, मोहरी आणि लाल मिरच्या दोन्ही हातांच्या ओंजळीत धरुन घड्याळाच्या दिशेने-विरुद्ध दिशेने फिरवुन फिकण्यात येतात (त्याच मिरच्या व मोहरी स्वयंपाकात फोडणीसाठी वापरु नका, उगाच जेवणाची चव वाढेलJ).

## 3.डोळ्यांचे फडकणे:

हा गैरसमज समाजात खुप पुर्वीपासुन आहे. आजच्या काळातही बरेच लोक डोळ्यांचा फडकण्याचे नाते भविष्यात त्यांच्यासोबत होणार्या चांगल्या-वाईट गोष्टींशी आहे असे समजतात. पुरूषांचा उजवा डोळा फडकणे म्हणजे काहीतरी चांगल्या घटनेचे संकेत आणि डावा डोळा फडकणे म्हणजे काही वाईट घडणार याचे संकेत. स्रियांचा बाबतील मात्र हे उलटे आहे (का ते मला माहीत नाही). स्रियांचा डावा डोळा फडकणे म्हणजे चांगले आणि उजवा डोळा फडकणे म्हणजे वाईट समजले जाते. खरे म्हणजे डोळ्यांचे फडकणे हे डोळ्यांचा पापण्यांतील स्नायुंच्या आकसण्यामुळे होत असते. ब्लाफेरोस्पाज्म किंवा ब्रेन डिसॉर्डर सारख्या आजारांत हे प्रमाण वाढते. डोळ्यांप्रमाणेच शरीराच्या दुसर्या अंगाबद्दलही अश्या समजुती आहेत, जसे पुरूषांचे डावे अंग फडकल्यास अशुभ घडते. मस्त्यपुराणात असे आणखी काही उल्लेख आहेत ज्यांचे वैज्ञानिक स्पष्टीकरण नाही,

डोक्याचे फडकणे म्हणजे जमीन आणि संपत्तीची वृद्धीचे संकेत, आतळ्यांचे फडकणे म्हणजे धन प्राप्तिचे संकेत, नाक फडकणे म्हणजे प्रियव्यक्तींशी भेटीचे संकेत, खालच्या ओठाचे फडकणे म्हणजे संतान सुखाचे संकेत ई.

## 4.घोड्याची नाळ:

घोड्याची नाळ घराच्या उंबर्यावर ठोकल्यास घरादारात बरकत येते अशी समजुत आहे. आजकालच्या जमान्यात घोड्याची वापरलेली नाळ सहसा भेटत नाही. ग्रामीण भागात मात्र अनेक घरांच्या उंबर्याना घोड्याची नाळ ठोकलेली तुम्हाला दिसेल.

## 5.नागपंचमी:

नाग दुध पितात हा एक खुप मोठा गैरसमज आहे. ग्रामीण भागात तर नागपंचमीला नाग पकडुन आणुन त्यांचा जबरदस्तीने दुध प्यायला लावले जाते, त्यामुळे दरवर्षी ह्या एका दिवसात हजारो साप/नाग मृत्युमुखी पडतात. नागपंचमीला शहरात साप/नाग घेऊन येणारे व्यक्ती नागपंचमीचा आधी अनेक दिवस त्यांना काहीही खायला प्यायला घालत नाहीत म्हणुन जेव्हा दुध समोर येते तेव्हा भुकेला साप ते पितो आणि जर का दुध पचले नाही तर तो मरण पावतो.

## 6 बाबाजी की बुटी:

ग्रामीण भागातच काय शहरातही अनेक असे बाबाजी असतात ज्यांनी कदाचित थेट देवाकडुन डॉक्टरेट मिळवलेली असते म्हणुनच ते कोणालाही राख/औषध देऊन बरे करु शकतात. अनेक भोळेभाबडे लोकं त्यांना बळी पडतात आणि हजारो रुपये लुटवितात. मी स्वत: माझ्या गावाकडे असे अनेक प्रसंग अनुभवले आहेत जेथे लोकांना आधी डॉक्टरकडे जाण्यापेक्षा एखाद्या बाबाकडे जाणे पसंद केले आणि तेच त्यांचा जवळचा व्यक्तीच्या मृत्युला कारण बनले. अश्या ढोंगी बाबांना मार्गी लावणे खुप कठीण काम असते. त्यांचावर आक्षेप घेणे म्हणजे स्वत:वर लोकांचा रोष ओढवुन घेणे भाग असते.

## 7.नागमणी/गुप्तधन:

याबद्दल तर जेवढे बोलावे तेवढे कमीच आहे. याबाबतीत तर महाराष्ट्र कदाचित प्रथम क्रमांकावर असावा. अश्या अनेक टोळ्या आहेत ज्या खास लोकांना आपले टार्गेट करुन त्यांना गुप्तधन वा नागमणीचा लोभ दाखवुन त्यांच्याकडुन लाखो उकळतात. नागमणीला आधीपासुनच इच्छापुर्तीचा मणी समजले जाते. त्यासाठी लोकांकडुन प्राण्यांची आणि अनेक वेळेस नरबळी देण्याच्याही घटना घडतात. समृद्धी व सुखशांतीचा लोभात आणि निराशेच्या गर्तेत हरविलेल्या लोकांचा या अंधश्रद्धेचा फायदा उचलुन ह्या टोळ्या आपले खिसे भरत असतात. नागमणी दाखविण्याचा नावाखाली लोकांकडुन लाखो उकळुन त्यांना अंधार्या ठिकाणी मातीत दडलेल्या एका लख्ख अश्या छोट्या लाईटचा प्रकाश दाखविण्यात येतो.

## 8. बळी:

भारतात रोज अनेक देवस्थानी पशुंचे बळी दिले जातात. मला तरी नाही वाटत की, कालिकामाता सोडली की कोणती देवी वा देव मांसाहारी असावा. कालिकामाताही फक्त राक्षसांचेच रक्त प्राशन करायची, ना की बकर्यां-कोंबड्यांचे. तुम्हीच सांगा देवलोकांना त्यांच्याच निर्मितीचा भाग असलेल्या त्या मुक्या प्राण्यांचा त्यांच्याचसमोर दिलेला बळी कसा बरे चालणार आहे? त्या मुक्या प्राण्यांसाठी हा तर सगळ्यात मोठा दहशतवाद झाला. असो, तो विषय नाहीच ए! विषय हा आहे की, लोकं अनेक प्राण्याचा बळी देव-देवीला खुष करण्यासाठी देतात की देवाच्या नावाखाली स्वत:ची भुक शांत करण्यासाठी???

## 9.विधवांची नामुष्की:

आपला समाज विधवांना अशुभ मानतो. काहीजण तर सकाळी सकाळी विधवा स्रीचे दर्शन होणे म्हणजे अतिशय अशुभ मानतात (लोटांगण घालुन नमस्कार त्या लोकांना). अनेकदा  नववधुला त्यांच्यापासुन लांब ठेवले जाते (हीच गत एका आई होऊ न शकणार्या स्रीचीही होते, तिलाही कोणाची ओटी भरायला सहसा बोलावले जात नाही). आधीपासुनच दुय्यम वागणुक दिल्या जाणार्या स्रीला अश्यावेळेस समाजाची दिली जाणारी अशी वागणुक कितपत सहन होणार आहे. अनेकदा तर स्रीचे घरचेही सोबत सोडतात म्हणुन अनेक अश्या स्रीया उत्तर प्रदेशातील वृंदावन येथे प्रस्थान करतात. अनेकदा त्यांचे पुढचे जीवन अतिशय वाईटरित्या जाते. आजकाल काही सासरची मंडळी स्वत:हुन त्यांच्या विधवा सुनेचा विवाह पुन्हा लाऊन देण्याचा चांगल्या घटनाही ऐकायला येतात.

## 10.नाट लागणे:

याबद्दल सांगणे काही कठीण नाहीये, बाहेर जाताना पाणी पिऊन जा, हे करुन जा ते करुन जा नाट लागलीये. नाट मोडुन बाहेर पडल्यास किंवा काही कार्य केल्यास विपरीत घडते असा समज आहे.

ही तर फक्त काही निवडक गैसमजुतींची यादी आहे....अजुन अश्या अनेक गोष्टी आहेत....जर का मी प्रत्येक गोष्टीची यादी करीत बसलो तर कदाचित यादी कधी संपणारच नाही....मांजर आडवे जाणे, पिंपळाचे झाड, मासिक धर्म, ग्रहण, चप्पल उलटे असणे, कापलेल्या नखांवर पाय पडणे, डाकीण ई....